# २०१८-१९

# विशाखा समिती

# (महिला कक्ष)

# अहवाल

## Sanitory napkin आणि स्वयं-स्वच्छता मार्गदर्शन




**Sanitory napkin आणि स्वयं-स्वच्छता मार्गदर्शन** कार्यक्रम-मार्गदर्शक **सौ. ज्योती पाटील**

**दि. ११.०९.२०१८**



# Sanitory napkin आणि स्वयं-स्वच्छता मार्गदर्शन

## दि. ११.०९.२०१८

मंगळवार दि. ११/०९/२०१८ रोजी दुपारी ११.०० ते १२.०० यावेळेत महाविद्यालयाच्या महिला कक्षाच्या वतीने **Sanitory napkin आणि स्वयं-स्वच्छता मार्गदर्शन** कार्यक्रम आयोजित करण्यात आला. Washable and hygienic **Sanitory napkin** च्या व्यावसायिक आणि Woman Self care Trainer **सौ. ज्योती पाटील** यांच्या मार्गदर्शनचा हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य **डॉ.अनार साळुंके** यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयातील इंग्लिश विभागातील **प्रा. डॉ. अर्चना बनाळे** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले आणि मार्गदर्शक सौ पाटील यांचा परिचय करून दिला. तसेच मा. प्राचार्यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर **सौ. ज्योती पाटील** यांनी **Sanitory napkin आणि स्वयं-स्वच्छता** या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या उत्पादना संदर्भातील विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसनही त्यांनी केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य **डॉ. अनार साळुंके** यांनी अध्यक्षीय समारोप करत विद्यार्थिनींना स्वयं स्वच्छते बाबत जागरूकतेची जाणीव करून दिली. अशाप्रकारचे **Sanitory napkins** महाविद्यालायामधून लवकरच उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी **प्रा. डॉ. अर्चना बनाळे** यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाच्या महिला अध्यापक-कर्मचारी व ९६ विद्यार्थींनी उपस्थिती होत्या.

# महिला कक्ष उद्घाटन व आरोग्यविषयक,कायदेविषयक मार्गदर्शन व निर्भया तक्रार पेटी संदर्भात मार्गदर्शन कार्यक्रम

**दि. १८.०९.२०१८**




महिला कक्ष उद्घाटन व आरोग्यविषयक,कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम

दि. १८.०९.२०१८



# महिला कक्ष उद्घाटन  व आरोग्यविषयक,कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम

## दि. १८.०९.२०१८

शनिवार दि. १८/०९ /२०१८ रोजी  दुपारी १.०० ते २.३० यावेळेत महाविद्यालयाच्या महिला कक्षाचा उद्घाटन समारोह व आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील महिला कक्षाचे उद्घाटन व विद्यार्थिनींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन, कायदेविषयक मार्गदर्शन असा हा दुहेरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

उद्घाटनाच्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आणि शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील महिला कक्षाच्या सदस्यांचे व मार्गदर्शक अतिथींचे स्वागत करण्यात आले. यावर्षीच्या गणपती मोहोत्सवात हजारो शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांना ***ECO-FRIENDLY गणपती*** बनवण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या **सौ. रोहिणी नायगावकर** यांचा '**भारतातील क्रांतिकारी महिला**' हे पुस्तक देऊन सत्कारही करण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयाच्या महिला कक्ष कार्यकारी प्रमुख प्रा .डॉ. कुलकर्णी जे.आर. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर महिला कक्ष मानद सदस्य, सामाजिक कार्यकर्त्या व धारासूरमर्दिनी महिला फेडरेशन, उस्मानाबादच्या उपाध्यक्ष ***सौ. संगीता काळे*** यांनी '***संघटन शक्ती, सामाजिक कार्य***' याविषयी मार्गदर्शन केले. महिला कक्ष मानद विधीज्ञ सदस्य व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ***श्री. अनुपकुमार देशपांडे*** यांनी ***महिला विषयक कायद्यां***संदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर **सौ. रोहिणी नायगावकर** यांनी **पर्यावरणपूरक गणपती निर्मिती प्रशिक्षणाचे** आपले अनुभव कथन केले. त्यांच्यानंतर व्होकेशनल महाविद्यालयाच्या **प्रा. डॉ. संध्या देशपांडे** यांनी विद्यार्थिनींना '**स्वयं स्वच्छता, आरोग्य व घ्यायची काळजी**' यासंदर्भात सखोल माहिती सांगून त्यांच्या शंकांचे निरसन केले. शिवाय स्त्रियांची कार्यक्षमता,आरोग्यदायी आहार,  विरोधी आहार व त्याचे दुष्परिणाम याविषयी शास्त्रोक्त माहितीही त्यांनी दिली.

शेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अध्यक्षीय भाषणात महिला कक्षाच्या कार्याचा लेखाजोखा मांडला. तर महिला कक्षाच्या कर्मचारी सदस्य प्रा. अनिता लिंगे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदानाने झाली.

यावेळी महाविद्यालायतील महिला कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला कक्ष सदस्य, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# निर्भया तक्रार पेटी संदर्भात मार्गदर्शन कार्यक्रम

## दि. १८.०९.२०१८

शनिवार दि. १८/०९ /२०१८ रोजी  दुपारी १.०० ते २.३० यावेळेत महाविद्यालयाच्या महिला कक्षाचा उद्घाटन समारोह व आरोग्यविषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याच कार्यक्रमा मध्ये महाविद्यालयाच्या महिला कक्षांतर्गत कार्यरत ***निर्भया तक्रार पेटी*** संदर्भात मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच ही  तक्रार पेटी मागील २ वर्षांपासून ठेवण्यात आली आहे.  विद्यार्थिनींच्या छेडछाड, शोषण व शारीरिक-मानसिक त्रासासंदर्भातील तक्रारी – समस्यांचे निराकरण हा या उपक्रमामागील हेतू आहे. यासंदर्भात अधिक माहिती या विभागाच्या कार्यकारी प्रमुख ***प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर.*** यांनी सांगितली. उघडपणे ज्या तक्रारी आपण इतरांना सांगू शकत नाही अशा तक्रारी आपल्या नावासकट वा निनावी, लेखी स्वरुपात या पेटीत टाकाव्यात. महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी समिती प्रमुख, सदस्य व प्राचार्यांच्या उपस्थितीत ही तक्रार पेटी उघडण्यात येते. त्यामध्ये आलेल्या लेखी तक्रारींची शहानिशा केली जाते. त्यानंतर प्राचार्यांसोबतच्या  अनौपचारिक बैठकीमध्ये त्यासंदर्भात निर्णय व अंमलबजावणी केली जाते, असे त्यांनी सांगितले. मा. प्राचार्यांनी देखील आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थिनींना निर्भय शैक्षणिक वातावरणाची ग्वाही दिली.

# आरोग्य तपासणी व मार्गदर्शन कार्यक्रम




शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन कार्यक्रम – उद्घाटन दि. २४.०९.२०१८






विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन कार्यक्रम- उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. छाया कुलकर्णी. व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.अनार साळुंके,प्रा.डॉ.संध्या देशपांडे, डॉ.वीणा पाटील, प्रा.डॉ.कुलकर्णी जे आर. दि.२४.०९.२०१८















**आरोग्य तपासणीचे लाभार्थी विद्यार्थी**

# आरोग्य तपासणी व मार्गदर्शन कार्यक्रम

## दि. २४.०९.२०१८

वरिष्ठ महाविद्यालयाच्या महिला कक्षातर्फे आणि व्होकेशनल महाविद्यालय व शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन असा दुहेरी कार्यक्रम दि. २४ सप्टेंबर २०१८ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० यावेळेत आयोजित करण्यात आला. कै.खा. प्रमोदजी महाजन सभागृहात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन, रक्तगट (ऐच्छिक), वजन व उंची, तसेच व्यक्तिगत तपासणी व्होकेशनल महाविद्यालयाच्या MLT विभाग व **शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, उस्मानाबाद** यांच्यावतीने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या व धन्वंतरीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर व्होकेशनल महाविद्यालयाच्या MLT विभाग व शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, उस्मानाबाद यांच्या कर्मचाऱ्यांचा स्वागत-सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या **प्राचार्य डॉ. अनार साळुंके** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाच्यावतीने **डॉ.वीणा पाटील व डॉ. छाया कुलकर्णी** यांनी विद्यार्थिनींना आरोग्य- आहार- स्वच्छता विषयक सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसनही त्यांनी केले. शेवटी महाविद्यालयाच्या महिला कक्ष प्रमुख, कार्यक्रमाच्या सूत्रसंचालक **प्रा. डॉ. कुलकर्णी जे.आर.**यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या औपचारिकतेनंतर विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच व्यक्तिगत तपासणी नंतर शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाच्यावतीने विद्यार्थिनींना योग्य ती औषधेही मोफत देण्यात आली..

# पोलीस दीदी ओळख व मार्गदर्शन







महाविद्यालय परिसरातील छेडछाडप्रतिबंधक पोलिस पथक व पोलिस दीदी ओळख व मार्गदर्शन कार्यक्रमात बोलताना पोलिस दीदी मुक्त लोखंडे आणि पोलिस श्री. शिवाजी शिरसाट.

दि.१८.१२.२०१८



# पोलीस दीदी ओळख व मार्गदर्शन

## दि.१८.१२.२०१८

महाविद्यालयाच्या महिला कक्षाच्या अंतर्गत मंगळवार दि. १८ डिसेंबर २०१८ रोजी दुपारी १२.५० ते १.३० यावेळेत पोलीस दीदी ओळख व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ***मा. प्राचार्य डॉ. अनार साळुंके*** यांच्या अनुमतीने व महिला कक्ष प्रमुख, तसेच अंतर्गत तक्रार निवारण समिती च्या पीठासनाधिकारी ***प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर.*** यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

महाविद्यालय व समर्थनगर परिसरासाठी उस्मानाबाद पोलीस आयुक्त कार्यालयाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या पोलीस दीदी श्रीमती मुक्ता प्रकाश लोखंडे आणि त्यांच्या सहकारी श्री शिवाजी शिरसाट यांनी मंगळवार दि. १८ डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयास भेट दिली. यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रथम उपस्थित मान्यवरांचे प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर यांनी पुष्प देऊन स्वागत केले व त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पोलीस दीदी म्हणजे काय, त्यांची विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच परिसरातील मुली-महिलांच्या सुरक्षितते संदर्भातील कार्य जबाबदारी आणि त्यासंदर्भातील कायदे याबाबतचे मार्गदर्शन पोलीस दीदी ***श्रीमती मुक्ता प्रकाश लोखंडे*** यांनी दिले. तर त्यांचे सहकारी पोलीस ***श्री शिवाजी शिरसाट*** यांनी विद्यार्थी जीवनातील आपले ध्येय, आपले सामाजिक दायित्व आणि स्वयं सुरक्षा याविषयी सखोल मार्गदर्शन व चर्चा केली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सतत जागरूक, सहकार्यशील राहून सुरक्षित राहण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर. यांनी केले. तर आभारप्रदर्शन प्रा. अनिता लिंगे यांनी केले.

# ICC संदर्भातील राजपत्राच्या प्रतींचे वाटप



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनीना ICCसंदर्भातील राजपत्राच्या प्रतींचे वाटप . दि.०३.०१.२०१९





# विद्यार्थिनींचे निवेदन



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थिनी-अध्यापिकांचे जिल्हाधिकारीयांना सुरक्षेबाबत निवेदन. दि. ०३.०१.२०१९



# ICC संदर्भातील राजपत्राच्या प्रतींचे वाटप व विद्यार्थिनींचे निवेदन

## दि.०३.०१.२०१९

गुरुवार दि. 3 जानेवारी २०१९ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त सकाळी १०.०० वाजता आयोजीत कार्यक्रमात महाविद्यालयाच्या महिला कक्षाच्या व अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने अंतर्गत तक्रार समितीच्या संदर्भातील कायद्याच्या/ राजपत्राच्या छायांकित प्रतींचे वाटप करण्यात आले.

दि. 3 व ४ जानेवारी २०१९ या दोन दिवसात महाविद्यालयातील मराठी विभागाच्या व डॉबाआंमवि, औरंगाबाद यांच्या वतीने नवोदित लेखकांसाठीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थी, अध्यापकांबरोबरच शहरातील साहित्यिक, साहित्य मंडळेही सहभागी झाली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त शहरातील अक्षरवेल महिला साहित्यिक मंडळाच्या प्रमुख ***सौ अपर्णा चौधरी*** उपस्थित होत्या. त्यांच्या व महाविद्यालयातील महिला कक्ष प्रमुख, तसेच अंतर्गत तक्रार निवारण समिती च्या पीठासनाधिकारी ***प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर.***यांच्या हस्ते विद्यार्थी - विद्यार्थिनींना अंतर्गत तक्रार समितीच्या संदर्भातील कायद्याच्या/ राजपत्राच्या ७० छायांकित प्रतींचे प्रातिनिधिक स्वरुपात वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालय परिसरात व समाजात घडणा-या छेडछाडीच्या, लैंगिक शोषणाच्या आणि त्याला रोखण्याच्या संदर्भात जाणीव-जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. याबाबत ***प्रा.डॉ. कुलकर्णी जे.आर.*** यांनी उपस्थितांना मार्गदर्शनही केले.

याच दिवशी उस्मानाबाद शहर मध्यवर्ती सावित्रीबाई फुले जयंती समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सहभाग घेत महाविद्यालयाच्या ९ विद्यार्थिनी व 3 महिला अध्यापकांनी माननीय जिल्हाधिका-यांसमोर शहरातील मुली-महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात मौखिक निवेदन दिले.

# आरोग्य सर्वेक्षण व मार्गदर्शन




रासेयो विशेष शिबिरांतर्गत आरोग्य सर्वेक्षण व मार्गदर्शन आणि युवती मंच स्थापना कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. साळुंके, कमलताई नलावडे. मंचावर उपस्थित युवती मंच प्रतिनिधी दि.१२.०१.२०१९




# आरोग्य सर्वेक्षण व मार्गदर्शन

**दि.१२.०१.२०१९**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरांतर्गत दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी चाळीशीवरील ग्रामीण महिलांच्या आरोग्याचे विहित नमुन्यात सर्वेक्षण करण्यात आले. तसेच विद्यार्थीनी-महिलांना आरोग्य व सामाजिक सुरक्षाविषयक मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयातील महिला कर्मचारीही यावेळी उपस्थित होत्या.

**आरोग्य सर्वेक्षण**: मौजे काजळा (तालुका उस्मानाबाद) येथे आयोजित महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरांतर्गत शनिवार दि. १२/०१/२०१९ रोजी सकाळी १०.३० ते २.३० यावेळेत काजळा गावातील चाळीशीच्या पुढील महिलांचे आरोग्य सर्वेक्षण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी विद्यार्थिनींनी ५ गटांमध्ये हे कार्य केले

**आरोग्य व सामाजिक सुरक्षाविषयक मार्गदर्शन**: सायंकाळी ३.०० ते ४.०० यावेळेत उस्मानाबाद शहरात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत ज्येष्ठ शिक्षणतज्ञ **कमलताई नलावडे** यांचे **'युवती सबलीकरण व सामाजिक सुरक्षा'** या विषयावर विद्यार्थिनी व स्थानिक महिलांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाच्या महिला कक्ष प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी जे.आर. यांनी प्रास्ताविकपर भाषण केले. त्यामध्ये विद्यार्थिनींनी केलेल्या आरोग्य सर्वेक्षणाच्या अनुषंगाने चर्चा व मार्गदर्शनही केले. त्यानंतर **कमलताई नलावडे** यांनी **'युवती सबलीकरण व सामाजिक सुरक्षा'** या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाय विद्यार्थिनींना स्वयंसुरक्षा, निर्भयता व सामाजिक बांधिलकीची जाणीवही करून दिली. तर अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनार साळुंके यांनी महिलांच्या आरोग्य संबंधी चर्चा करताना त्यांच्या आहार-विहार-आरोग्य व स्वच्छतेबाबत घेण्याच्या दक्षता व उपाययोजना यावर वक्तव्य केले.त्यानंतर विद्यार्थिनी व स्थानिक महिलांच्या शंकांचे निरसन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन, आभारप्रदर्शन हे सर्व विद्यार्थिनींनीच केले. आभार प्रदर्शना नंतर सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# युवती मंच स्थापना





रासेयो विशेष शिबिरांतर्गत आरोग्य सर्वेक्षण व मार्गदर्शन आणि युवती मंच स्थापना कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी कु.गीता सोती आणि मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. साळुंके, मंचावर उपस्थित युवती मंच प्रतिनिधी दि.१२.०१.२०१९



# युवती मंच स्थापना

दि.१२/०१/२०१९

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरांतर्गत विद्यार्थीनी व महिलाना चाळीशीवरील ग्रामीण महिलांच्या आरोग्याचे विहित नमुन्यात सर्वेक्षण आणि आरोग्य व सामाजिक सुरक्षाविषयक मार्गदर्शन शनिवार दि. १२/०१/२०१९ रोजी आयोजित करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम महाविद्यालयातील कला, विज्ञान व संगणक उपयोजन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींचा युवती मंच स्थापन करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनार साळुंके आणि कमलताई नलावडे यांनी यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले आणि शुभेच्छाही दिल्या.

या मंचाद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थिनी दरवर्षी विविध सांस्कृतिक, सामाजिक जाणीव-जागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करतात. तसेच महाविद्यालयाच्या महिला कक्षाच्या विविध उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवतात. विद्यार्थिनींच्या कृतिशीलतेला वाव देणे, त्यांच्यातील कलागुणांना उजाळा देणे, त्यांच्यात सांस्कृतिक सामाजिक व स्वयं-सुरक्षा विषयक जाणीव-जागृती निर्माण करणे, तसेच महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रमामध्ये त्यांचा सहभाग वाढविणे आणि विद्यार्थिनींच्या यासंदर्भातील अडीअडचणी जाणून घेऊन त्या सोडविणे हा या युवती मंच स्थापनेमागील उद्देश असतो. मा. प्राचार्य डॉ. अनार साळुंके यांचा या मंचाच्या कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग नेहमीच असतो.

युवती मंच – विद्यार्थिनी प्रतिनिधी :

विज्ञान शाखा - १. गळाकाटे सोनाली किसन २. जोशी कुमुदिनी विनोद 3.पोंदे अनुराधा महादेव

कला शाखा - १. कुंभार रजनी सुर्यकांत २. वंजारे वृंदा राघोजी 3. शिंदे अश्विनी पुंडलिक

# युवती मंच आयोजित स्पर्धा



युवती मंच आयोजित विविध स्पर्धा दि.१९ ते २६.०१.२०१९









युवती मंच आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण दि.२६.०१.२०१९








युवती मंच आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण दि.२६.०१.२०१९

# युवती मंच आयोजित स्पर्धा सप्ताह

## दि.१९ ते २६/०१/१९

शनिवार दि १९ ते २६ जानेवारी २०१९ या कालावधीत महाविद्यातील महिला कक्षांतर्गत स्थापित युवती मंचाच्या वतीने व्होकेशनल महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी विविध सांस्कृतिक स्पर्धा व खेळांचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धांमध्ये मेंदी,रांगोळी, संगीत खुर्ची या स्पर्धा , तर A..B..C....Z, छोटे मियां..बडे मियां, गरम गरम भात..मी नाही खात असे खेळ घेण्यात आले. या विविध खेळ व स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील ७५ ते ७० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मा. प्राचार्य डॉ. अनार साळुंके यांच्या सूचनेनुसार ग्रंथालय परिचर गौरी कुलकर्णी, प्रयोगशाळा सहाय्यक मंजुश्री काटे यांनी तसेच महाविद्यालयाच्या सर्व महिला अध्यापक-कर्मचा-यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. अतिशय उत्साहात पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये पुढील विद्यार्थिनींनी यश मिळविले.—

१. मेंदी स्पर्धा – वरिष्ठ महाविद्यालय

i) शेळके प्राजक्ता सुधीर, गुंड निशा उमेश – प्रथम

ii) गळाकाटे सोनाली किसन, धनके सुजीता रामचंद्र –द्वितीय

iii) शिंदे भाग्यश्री शेषेराव – तृतीय

व्होकेशनल – i) प्रजापती ज्योती जगदीश – प्रथम

ii) तावशीकर वैष्णवी सिद्धनाथ –द्वितीय

iii) मुळे मयुरी तुकाराम – तृतीय

२.रांगोळी स्पर्धा – i)जानराव राजश्री मगन – प्रथम

ii) गुंड निशा उमेश – द्वितीय

iii) जंगले श्रद्धा मोहन, धनके सुजीता रामचंद्र – तृतीय

3.संगीत खुर्ची स्पर्धा - वरिष्ठ महाविद्यालय

i) गुंड निशा उमेश – प्रथम

ii) शेळके मोहिनी सुभाष – द्वितीय

iii) व्हरकाटे रोहिणी श्रीराम – तृतीय

व्होकेशनल – i) कांबळे स्वरांजली गौतम – प्रथम

ii) कुलकर्णी अंकिता संजय – द्वितीय

iii) तावशीकर वैष्णवी सिद्धनाथ – तृतीय

| **खेळ : १. A..B..C-** | **2. छोटे मियां,बडे मियां** | **3. गरम गरम भात...** |
|---|---|---|
| i) सरवदे सह्याद्री संजय | i) जोशी कुमुदिनी विनोद | i) सूर्यवंशी प्रतीक्षा बाळासाहेब |
| ii) भंडारे नम्रता सुनील | ii) थोरात गीतांजली महादेव | ii) वंजारे नेहा सुधाकर |
| iii) कुलकर्णी श्वेता बालाजी | iii) गळाकाटे सोनाली किसन | ii) पुरी मयुरी लक्ष्मण |
| iv) शेळके प्राजक्ता सुधीर | iv)चौरे मोहिनी मालोजी, | ii) कुंभार रेश्मा राघू |
| v) मुळे श्रुती तुकाराम | v) पोंदे अनुराधा महादेव | iii) प्रजापती ज्योती जगदीश |

२६ जानेवारी २०१९ रोजी या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थिनींना मा. प्राचार्य डॉ. अनार साळुंके ,मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. प्रशांत चौधरी व ग्रंथालय प्रमुख श्री.सचिन महाजन यांच्या हस्ते वही,पेन,गुलाब पुष्प देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.